सत्यमेव जयते

महाराष्ट्राचे राज्यपाल

# माननीय श्री. चे. विद्यासागर राव

यांचे

# अभिभाषण

महाराष्ट्र राज्य विधानमंडळाचे मुंबई येथील संयुक्त अधिवेशन

२६ फेब्रुवारी २०१८

**सभापती महोदय, अध्यक्ष महाराज आणि सन्माननीय सदस्यहो,**

१. राज्य विधानमंडळाच्या २०१८ या वर्षाच्या पहिल्या अधिवेशनामध्ये आपणा सर्वांचे स्वागत करताना मला अतिशय आनंद होत आहे.

२. माझे शासन, छत्रपती शिवाजी महाराज, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा जोतिबा फुले, राजर्षी छत्रपती शाहू महाराज आणि यांसारख्या इतर अनेक थोर नेत्यांनी आणि समाज सुधारकांनी घालून दिलेल्या उच्च आदर्शांचे अनुसरण करण्यासाठी कटिबद्ध आहे.

३. देशाचे संरक्षण करताना आपल्या प्राणांची आहुती दिली आहे अशा शहीद जवानांच्या सन्मानासाठी माझे शासन " शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे शहीद सन्मान योजना " राबवित आहे. या योजनेअंतर्गत शहीद जवानांच्या पत्नींना राज्य परिवहन उपक्रमाच्या सर्व प्रकारच्या प्रवासी बसगाड्यांमधून आयुष्यभर मोफत प्रवास करण्याचा लाभ देण्यात येईल आणि त्यांच्या पाल्यांना राज्य परिवहन उपक्रमामध्ये नोकऱ्या देण्यात येतील.

४. कर्नाटक सीमा वादाशी संबंधित बाबींचे महत्त्व व संवेदनशीलता विचारात घेता, माझे शासन सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित बाबींचा सातत्याने पाठपुरावा करत आहे. तसेच, केंद्रीय गृह मंत्रालयाने याप्रकरणी न्याय्य भूमिका घ्यावी, यासाठी माझे शासन केंद्र सरकारच्या अत्युच्च स्तरावर संपर्क ठेवून आहे.

५. माझ्या शासनाने, मुंबई जवळील अरबी समुद्रातील बेटावर छत्रपती शिवाजी महाराज यांचा भव्य अश्वारूढ पुतळा उभारण्याचा प्रकल्प हाती घेतला आहे. हा प्रकल्प कार्यान्वित करण्यासाठी कार्यादेश काढण्याचे काम अंतिम टप्प्यात आहे.

६. महाराष्ट्राला प्रगतिपथावर नेण्यासाठी सन २०२५ पर्यंत महाराष्ट्राची अर्थव्यवस्था एक हजार अब्ज डॉलर इतकी करणे हे माझ्या शासनाचे लक्ष्य आहे. हे लक्ष्य, कृषि, वस्त्रोद्योग, पर्यटन, नवउद्यम यांसारख्या क्षेत्रांत वाढ करून आणि आवश्यक कौशल्य विकास सहाय्यासह उद्योगामध्ये गुंतवणूक करून साध्य होऊ शकेल. या प्रयोजनांसाठी, संरक्षण, कृषि व अन्न प्रक्रिया, वस्त्रोद्योग, अंतराळ, लॉजिस्टिक्स, वित्ततंत्रज्ञान, ॲनिमेशन, रोबोटिक्स, कृत्रिम बुद्धिमत्ता, इत्यादींसारख्या उद्योगांशी संबंधित धोरणे राबविण्यात आली आहेत.

७. महाराष्ट्राच्या स्थूल उत्पन्नामध्ये, २०१२-१३ मध्ये ६ टक्के, २०१३-२०१४ मध्ये ७.३ टक्के आणि २०१४-१५ मध्ये ५.४ टक्के इतक्या दराने वाढ झाली आहे. २०२५ पर्यंत अर्थव्यवस्थेची उलाढाल एक हजार अब्ज डॉलरपर्यंत पोहोचविण्याचे लक्ष्य साधण्याकरिता, माझ्या शासनाने पायाभूत सुविधा व कृषि क्षेत्रांमधील गुंतवणुकीत वाढ केली आहे. परिणामी, राज्याच्या स्थूल उत्पन्नात २०१५-१६ मध्ये ८.५ टक्के आणि २०१६-१७ मध्ये ९.४ टक्के इतकी वाढ झाली आहे. या उच्च वृद्धिदरामध्ये वेगाने वाढ व्हावी यासाठी माझ्या शासनाने पायाभूत सुविधांच्या आधारे विकास साध्य करण्याचे निश्चित केले आहे.

८. महाराष्ट्राची अर्थव्यवस्था निर्धारित वेळेत एक हजार अब्ज डॉलर पर्यंत नेण्याच्या दृष्टीने राबविण्यासाठीची विशिष्ट धोरणे व कार्यक्रम मी विशद करतो.

९. माझ्या शासनाकडे वारसाहक्काने संकटात सापडलेले कृषि क्षेत्र आले आहे. या क्षेत्रात २०१२-१३ मधील उणे ०.५ टक्के आणि २०१४-१५ मधील उणे ११.२ टक्के इतक्या नकारात्मक वाढीच्या दरापासून २०१६-१७ मधील अधिक १२.५ टक्क्यांपर्यंत अभिवृद्धी दर वाढला आहे. ही वाढ २०१७-१८ मध्येही अशीच होणे अपेक्षित आहे. कृषि क्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करून ही वाढ साध्य करण्यात आली आहे. २०१३-२०१४ या वर्षातील २९,००० कोटी रुपये इतकी झालेली गुंतवणूक २८० टक्क्यांनी वाढून २०१७-१८ मध्ये ती ८३,००० कोटी रुपये इतकी झाली आहे.

१०. मागेल त्याला शेततळे, पंपसंचाचे विद्युतीकरण करणे आणि जलयुक्त शिवार यांमार्फत मत्ता निर्माण करून माझ्या शासनाने, कृषि क्षेत्रामध्ये आमूलाग्र बदल घडविला आहे. या मत्ता निर्मितीकरिता पुरेशा गुंतवणुकीशिवाय भरपाई प्रदानाचा आधीच्या दृष्टिकोनाच्या विपरित अशी ही भूमिका आहे. 'प्रधानमंत्री फसल बिमा योजना' सर्वदूर राबवून आणि किमान आधारभूत किंमत योजनेअंतर्गत शेतीमाल खरेदी करून, शेतकऱ्यांना, नैसर्गिक आपत्तींमुळे तोंड द्यावे लागणाऱ्या जोखीमांविरुद्ध संरक्षित केले जाईल याची सुनिश्चिती करण्याचाही आमचा प्रयत्न आहे.

११. शेतकऱ्यांची अडचण ही प्रामुख्याने त्यांना परवडणाऱ्या व्याज दराने संस्थात्मक कर्ज मिळण्याच्या अभावाशी संबंधित आहे. २०१३-१४ मध्ये फक्त ३८ टक्के शेतकऱ्यांना अनुसूचित व सहकारी बँकांकडून पीक कर्ज मिळाले होते. थकबाकीदार ठरल्याने किंवा अनुत्पादक प्रवर्गात समावेश झाल्याने ६० टक्क्यांहून अधिक शेतकऱ्यांना पीक कर्ज मिळत नव्हते. त्यामुळे, अशा शेतकऱ्यांना संस्थात्मक कर्ज मिळावे याकरिता माझ्या शासनाने " छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना " राबविली आहे. या योजनेची व्याप्ती विस्तृत असून त्याद्वारे लाभार्थ्यांना विशेषतः विदर्भ, मराठवाडा भागातील शेतकऱ्यांना कर्ज सहाय्याचा अभूतपूर्व लाभ मिळाला आहे. मला

आपणांस सांगण्यास आनंद होत आहे की, आतापर्यंत ५४.७२ लाख मान्यताप्राप्त खात्यांपैकी ४६.३५ लाख खात्यांकरिता कर्जमाफी आणि नियमित कर्जफेड करण्यासाठीचा प्रोत्साहनाबाबतचा निधी संबंधित बँकांना उपलब्ध करून देण्यात आला आहे. उर्वरित खात्यांच्या बाबत छाननी सुरू आहे. अद्यापपर्यंत ३१.३३ लाख शेतकऱ्यांच्या खात्यात रु. १२,३८१ कोटी इतकी रक्कम थेट हस्तांतरित करण्यात आली आहे.

**१२.** बदलत्या हवामानाशी जुळवून घेऊन शेती सक्षम करण्यासाठी, माझ्या शासनाने " नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पाची " अंमलबजावणी अमरावती व मराठवाडा विभागातील १५ जिल्ह्यांमध्ये तसेच, जळगाव आणि वर्धा जिल्ह्यांमध्ये सुरू केलेली आहे. यात जागतिक बँकेच्या कर्जाच्या सहाय्याने ४,००० कोटी रुपयांची गुंतवणूक करण्यात येईल. या प्रकल्पामुळे सर्व ९३२ क्षारपीडित गावांचे प्रश्न सुटण्यासाठी मदतच होईल.

**१३.** जमिनीची उत्पादकता वाढविण्यासाठी उत्तम मृदा व सिंचनाची सुविधा हे दोन अत्यंत महत्त्वाचे घटक आहेत. याबाबतीत, माझ्या शासनाने " प्रधानमंत्री कृषि सिंचाई योजने " अंतर्गत समाविष्ट करण्यात आलेल्या २६ अपूर्ण सिंचन प्रकल्प पूर्ण करण्याच्या कामाला गती दिली असून पुढील दोन वर्षांमध्ये त्यांचे काम पूर्ण करण्यात येईल. यामुळे, ५.५६ लाख हेक्टर इतकी अतिरिक्त सिंचन क्षमता निर्माण होईल.

**१४.** माझ्या शासनाने, कृषि संकटास सामोरे जाणाऱ्या जिल्ह्यांमध्ये, ' बळीराजा जलसंजीवनी योजना ' लागू केली आहे. या योजनेअंतर्गत, माझ्या शासनाने पुढील ३ वर्षांमध्ये, चौदा हजार कोटी रुपये इतक्या एकूण गुंतवणुकीचे ८३ लघुसिंचन व २९ मोठे व मध्यम सिंचन प्रकल्प पूर्ण करण्याचे ठरविले आहे. त्यामुळे, सुमारे तीन लाख बेचाळीस हजार हेक्टर इतक्या जमिनीची अतिरिक्त सिंचन क्षमता निर्माण होईल.

**१५.** माझ्या शासनाने विशेषतः विदर्भ व मराठवाडा क्षेत्रांमध्ये ३ लाख इतक्या अतिरिक्त कृषिपंपांचे विद्युतीकरण केले आहे. विजेचा कमी दाब व व्होल्टेज गळतीच्या घटना यांचे प्रमाण कमी करून सर्वांना अखंडितपणे खात्रीशीर वीज पुरवठा करण्यासाठी माझे शासन अहोरात्र प्रयत्न करीत आहे. त्याकरिता, " दीनदयाळ उपाध्याय ग्राम ज्योती योजना " व " एकात्मिक वीज विकास योजने " अंतर्गत वीज पारेषण व वितरण संबंधातील पायाभूत सोयीसुविधांचे बळकटीकरण करण्यात येत आहे.

**१६.** पाण्याचा काटकसरीने वापर करण्यासाठी माझे शासन, ठिबक सिंचन पद्धतीच्या वापरास व्यापक चालना देत आहे. या योजनेअंतर्गत उसाच्या पिकाकरिता व्याजामध्ये अर्थसहाय्य देण्यात येत असून शेतकऱ्यांसाठी व्याजाचा परिणामकारक दर २ टक्के इतका अल्प असेल.

१७. मृद व जलसंधारणाची वाढती गरज लक्षात घेता, माझ्या शासनाने, "मृद व जलसंधारण विभागाच्या" संस्थात्मक संरचनेचे बळकटीकरण करण्याचे ठरविले आहे.

१८. माझ्या शासनाच्या अत्यंत महत्त्वाकांक्षी अशा "जलयुक्त शिवार कार्यक्रमा" अंतर्गत मे २०१८ पर्यंत सुमारे पंधरा हजार गावे दुष्काळमुक्त करण्यात येत आहेत.

१९. काळाच्या ओघात जलाशयामध्ये गाळ साचल्याने त्यांची साठवण क्षमता कमी झाली आहे. माझ्या शासनाने, लोकसहभागातून धरणांमधील गाळ उपसून हा गाळ शेत जमिनीची सुपीकता वाढविण्यासाठी वापरण्याची "गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार" ही नवीन योजना सुरू केली आहे. आतापर्यंत २,००३ जलाशयांतून ९४ लाख घन मीटर इतका गाळ उपसण्यात आला आहे. या प्रयोजनासाठी एकूण ३१,४५९ इतक्या धरणांची निवड करण्यात आली आहे.

२०. बाजार समितीच्या व्यवस्थापनामध्ये शेतकऱ्यांना थेट सहभागी करून घेण्यासाठी आणि त्यांच्या शेतमालाला चांगला भाव मिळण्याच्या उद्देशाने माझ्या शासनाने कृषि उत्पन्न पणन समिति अधिनियमाच्या संबंधित तरतुदींमध्ये सुधारणा केल्या आहेत.

२१. शेतकऱ्यांना अडते व दलालांच्या विळख्यातून सोडविण्याच्या आणि त्यांच्या शेतमालाला चांगला भाव मिळण्याच्या उद्देशाने, माझ्या शासनाने, ३० बाजार समित्यांना इ-व्यापार सुविधा पुरविली असून इ-नाम द्वारे सर्व १४५ मुख्य बाजार समित्या समाविष्ट करण्याची योजना आखली आहे.

२२. याखेरीज, शेतकऱ्यांच्या शेतमालाला चांगला भाव मिळण्यासाठी सहाय्यभूत व्हावे म्हणून माझ्या शासनाने, संबंधित कालावधीत ५.७ लक्ष क्विंटल डाळीची आणि २.५ लक्ष क्विंटल सोयाबीनची खरेदी केली. परिणामतः जानेवारी २०१८ मध्ये सोयाबीनच्या बाजारभावात प्रति क्विंटल ३,०५० रुपयांपर्यंत वाढ झाली आहे.

२३. सहकारी पणन व्यवस्था सक्षम करण्यासाठी माझ्या शासनाने, २५ डिसेंबर २०१६ पासून "अटल महापणन विकास अभियान" सुरू केले आहे. आतापर्यंत सुमारे ८०० सहकारी पणन संस्थांनी नवीन व्यवसाय सुरू केले असून त्याद्वारे त्या आर्थिक सक्षमीकरणाकडे वाटचाल करीत आहेत. नोव्हेंबर २०१९ पर्यंत किमान पाच हजार संस्थांना सक्षम करण्याचे निश्चित केले आहे.

२४. शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट होण्याच्या दृष्टीने दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन, शेळीपालन यांना चालना देऊन त्याद्वारे उपजीविकेचे पूरक स्रोत निर्माण करण्यात येत आहेत. तसेच, "राजे यशवंतराव होळकर महामेष योजना" राबवून त्याद्वारे मेंढी पालनास प्रोत्साहन देण्यात येत आहे.

२५. "राष्ट्रीय कृषि विकास योजने" अंतर्गत, राष्ट्रीय दुग्धविकास मंडळाच्या सहाय्याने विदर्भ व मराठवाड्यातील ११०० गावांमध्ये एक विशेष दुग्धविकास प्रकल्प राबविण्यात येत आहे. नागपूर येथे दुग्धप्रक्रिया प्रकल्प सुरू झाल्यापासून एका वर्षाच्या आत प्रति दिन सुमारे २ लाख लिटर इतके दूध संकलनाची उपलब्धी झाली आहे.

२६. माझ्या शासनाने कृषि प्रक्रिया धोरणाला देखील मंजुरी दिली असून त्याद्वारे शेतकऱ्यांना भाजीपाला व फळे यांसारख्या उत्पादनावर प्रक्रिया करणे शक्य होणार आहे.

२७. माझ्या शासनाने, "महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेची" "समृद्ध महाराष्ट्र जनकल्याण" योजनेशी सांगड घालून त्या योजनेअंतर्गत उत्पादक मत्तांच्या निर्मितीवर लक्ष केंद्रित केले आहे. शेतीशी संबंधित मत्ता निर्माण करण्याच्या संबंधातील कामांपैकी ६५ टक्के कामे आणि त्यांच्याशी संलग्न असलेली कार्ये या योजनेत समाविष्ट असून, मागील दोन वर्षात ३७,००० पेक्षा अधिक विहिरी बांधण्यात आल्या आहेत आणि ७८,००० विहिरी बांधण्याचे काम सुरू आहे. त्याचप्रमाणे, १०,५५२ एकर इतके क्षेत्र बागायती पिकांखाली आणण्यात आले असून ७०,३०० एकर क्षेत्र बागायतीखाली आणण्याचे काम प्रगतिपथावर आहे. या योजनेअंतर्गत ५४९ लक्ष मनुष्य दिवस इतके काम निर्माण झाले असून चालू वित्तीय वर्षामध्ये जानेवारी २०१८ पर्यंत सुमारे १,६०० कोटी इतकी रक्कम खर्च करण्यात आली आहे.

२८. 'मागेल त्याला शेततळे' या योजनेअंतर्गत, ६२,००० पेक्षा अधिक शेततळी बांधण्यात आली असून, त्यामुळे दुष्काळग्रस्त क्षेत्रास लाभ होणार आहे.

२९. माझ्या शासनाने, विशेषतः आदिवासी क्षेत्रातील कुपोषण आणि नवजात बालकांचा मृत्यूदर कमी करण्याचे उद्दिष्ट ठेवले असून आदिवासी बालके व मातांच्या आरोग्य आणि पोषण आहाराचा दर्जा सुधारणे तसेच त्यांच्या उपजीविकेच्या संधीत वाढ करणे या दृष्टीने विविध कार्यक्रम सुरू केले आहेत. परिणामी, २०१२-१३ मध्ये प्रति हजार बालकांमागे २४ इतका असलेला बाल मृत्युदर सन २०१६ मध्ये लक्षणीयरीत्या प्रति हजारी १९ इतका कमी झाला आहे. त्याचप्रमाणे, २०१३-१४ मध्ये ४,४०१ इतकी असलेली कुपोषित बालकांची संख्या २,४२८ इतकी कमी झाली आहे. कुपोषणाचे अधिक प्रमाण असणाऱ्या क्षेत्रांमध्ये ग्राम बालविकास केंद्रे सुरू करण्यात आली आहेत.

३०. पालघर जिल्ह्यात मंत्री कार्यगटाने तयार केलेली विशेष कृतियोजना राबवून एप्रिल ते सप्टेंबर २०१७ या कालावधीत, बाल मृत्युदराचे प्रमाण २२ टक्क्यांनी कमी करून आरोग्याचे एक आश्वासक उद्दिष्ट साध्य केले आहे.

३१. गरोदर महिलांना त्यांच्या दुसऱ्या व तिसऱ्या तिमाहीत दर्जेदार आरोग्य सेवा पुरविण्याचा उद्देश असलेल्या "प्रधानमंत्री सुरक्षित मातृत्व अभियान" या केंद्र पुरस्कृत नवीन कार्यक्रमाला राज्यात अतिशय चांगला प्रतिसाद मिळत असून या कार्यक्रमांतर्गत ६ लाखांपेक्षा अधिक महिला त्याचा लाभ घेत आहेत.

३२. राज्यात राबविण्यात येत असलेल्या "पंतप्रधान मातृ वंदना योजना" या आणखी एका केंद्र पुरस्कृत योजनेअंतर्गत, गरोदर असताना आणि पहिल्या बाळंतपणानंतर झालेली वेतनाची हानी भरून काढण्यासाठी पाच हजार रुपये इतकी रोख रक्कम देण्यात येते. वर्षभरात या योजनेचा अंदाजे एक लाख महिलांनी लाभ घेतला आहे.

३३. "डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम अमृत आहार योजने" अंतर्गत अनुसूचित क्षेत्रातील १.३ लाख गरोदर व स्तन्यदा मातांना प्रतिदिन एक चौरस आहार भोजन तसेच ७ महिने ते ६ वर्षे या वयोगटातील ७.६ लाख बालकांना आठवडयातून चार दिवस अंडे किंवा केळी देण्यात येत आहेत.

३४. "राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमा" अंतर्गत आरोग्य तपासणी दरम्यान ८,००० पेक्षा अधिक शस्त्रक्रिया करण्यात आल्या असून त्यामध्ये व्याधिग्रस्त बालकांवर केलेल्या १,०५० हृदय शस्त्रक्रियांचा समावेश आहे.

३५. दुष्काळामुळे कृषिविषयक संकट भेडसावणाऱ्या महाराष्ट्रातील सर्व १४ जिल्ह्यांमध्ये आरोग्य समस्यांबाबत समुपदेशन करण्यासाठी एक प्रकल्प "प्रेरणा प्रकल्प" म्हणून हाती घेण्यात आला होता. ३ दशलक्ष कुटुंबापेक्षा अधिक कुटुंबांना या अभियानामधून लाभ प्राप्त झाला आहे.

३६. माझ्या शासनाने "महात्मा जोतिबा फुले जन आरोग्य योजने" अंतर्गत २.२४ कोटी कुटुंबांना आरोग्य विमा कवच उपलब्ध करून दिले असून त्याद्वारे सुमारे ४ लाख शस्त्रक्रिया व उपचारपध्दतींना जानेवारी, २०१८ पर्यंत मंजुरी देण्यात आली आहे.

३७. ग्रामीण भागांतील महिला व मुलींच्या मासिक पाळीदरम्यानच्या आरोग्याची सुनिश्चिती करण्याच्या हेतूने, माझ्या शासनाने ठोस उपाययोजना केल्या आहेत. ग्रामीण भागातील ११ ते १९ या वयोगटातील महिला व मुलींना परवडण्यायोग्य दरात आरोग्यदायी पाळीच्या घड्या म्हणजेच सॅनिटरी नॅपकिन्स पुरविण्याकरिता, राज्यात "अस्मिता योजना" राबवण्याचे प्रस्तावित केले आहे.

३८. स्वामी विवेकानंदांच्या म्हणण्यानुसार, "जनतेला शिक्षण देण्याची व तिचा स्तर उंचावण्याची गरज आहे आणि केवळ अशाप्रकारेच एक राष्ट्र उभारणे शक्य आहे". आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांच्या सर्वंकष विकासाकरिता माझे शासन सक्रिय असून पौगंडावस्थेतील मुलांच्या व मुलींच्या शिक्षणातील

चिंताजनक दरी कमी करण्याच्या उद्देशाने, शासनाने " जीवन कौशल्य शिक्षण " हा उपक्रम सुरू केला आहे. प्रशिक्षण व क्षमता उभारणी उपक्रमाचा पहिला व दुसरा टप्पा राबविण्यात आला असून त्याद्वारे, ९०,००० हून अधिक विद्यार्थ्यांशी संबंधित ५४३ शासकीय आश्रमशाळांमधील ३,२५८ शिक्षकांना व वसतिगृह अधीक्षकांना प्रशिक्षित करण्यात आले आहे.

**३९.** आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांना आवश्यक असणाऱ्या वस्तू त्यांच्या आवडीनुसार खरेदी करणे शक्य व्हावे या उद्देशाने " थेट लाभ हस्तांतरण " योजना सुरू करण्यात आली असून त्याद्वारे अशी खरेदी करण्याकरिता लागणारी आवश्यक रक्कम विद्यार्थ्यांच्या बँक खात्यामध्ये थेट जमा केली जात आहे.

**४०.** ४०० शासकीय आश्रमशाळांमध्ये विज्ञान विषयाच्या अध्यापन व अध्ययनासंबंधात सुधारणा करण्याच्या दृष्टीने माझ्या शासनाने, अध्यापनाच्या बाबतीत विशेषज्ञ असलेल्या " एकलव्य " या संघटनेशी तीन वर्षांची भागीदारी केलेली आहे. या उपक्रमामध्ये, शिक्षकांची प्रशिक्षण सत्रे आयोजित करणे, शिक्षकांना तसेच विद्यार्थ्यांना विज्ञान संचांची प्रत्यक्ष हाताळणी करण्याची सुविधा पुरवणे आणि क्षेत्रीय गटांमार्फत शिक्षकांना निरंतर सहाय्य करणे या बाबींचा समावेश आहे.

**४१.** इंग्रजी भाषेच्या नैपुण्यात सुधारणा करण्याच्या उद्देशाने, ११८ शासकीय आश्रमशाळांमध्ये व १४ एकलव्य पब्लिक स्कूलमध्ये एका पथदर्शी प्रकल्पाची अंमलबजावणी करण्यात येत आहे.

**४२.** " वॉश " कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या उद्देशाने " आश्रमशाळा कायापालट अभियान " प्रभावीपणे राबविण्यात येत असून, त्यामध्ये प्रसाधनगृहे, हात धुण्याच्या जागा, पाणी पुरवठा योजना व आरोग्यपूर्ण स्वयंपाकगृहे व भोजन कक्ष बांधणे अनिवार्य आहे. आश्रमशाळा कर्मचारीवर्गाला आणि विद्यार्थ्यांना स्वच्छता व आरोग्य यांच्या संदर्भात संस्कारित करण्याबाबत प्रशिक्षित करण्यात येत आहे.

**४३.** माझ्या शासनाने, पेसा क्षेत्रातील ग्रामपंचायतींना जनजाती क्षेत्र उप-योजनेतून उपलब्ध मुक्त निधीच्या नियतवाटपामध्ये वाढ केलेली आहे. परिणामी, दर वर्षी पेसा क्षेत्रातील ग्रामपंचायतींना ३३७ कोटी रुपये इतके अतिरिक्त नियतवाटप मिळणार आहे.

**४४.** राज्यात " प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र " या कार्यक्रमांतर्गत गतिमान शिक्षण उपक्रम सुरू करण्यात आला असून त्याद्वारे ४५,६७६ प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळा प्रगत झाल्या आहेत. ६१,२४७ शाळा डिजिटल झाल्या आहेत, तर ३,३२५ शाळांना " आय.एस.ओ. ९००० " मानांकन देण्यात आलेले आहे.

४५. माझ्या शासनाने, आंतरराष्ट्रीय शैक्षणिक मानक दर्जाच्या १०० शाळा स्थापन करण्याचे निश्चित केले असून आंतरराष्ट्रीय दर्जाच्या शाळांच्या संलग्नीकरणाकरिता, “ महाराष्ट्र आंतरराष्ट्रीय शिक्षण मंडळ ” स्थापन करण्याचे ठरविले आहे.

४६. क्रीडापटूंच्या योगदानाची दखल घेण्याच्या हेतूने माझ्या शासनाने राष्ट्रीय खेळांमध्ये पदके मिळविणाऱ्या खेळाडूंना रोख बक्षिसे देण्याचे ठरविले आहे.

४७. “ राजर्षी छत्रपती शाहू महाराज राज्य शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजने ” अंतर्गत पात्र होण्याकरिता कुटुंबाची उत्पन्न मर्यादा १ लाखावरुन ६ लाख एवढी वाढविण्यात आलेली आहे. या योजनेंतर्गत उच्च, तंत्र, कृषि, पशुसंवर्धन आणि वैद्यकीय शिक्षणाच्या सर्व ६०५ पाठ्यक्रमांचा समावेश करण्यात आला आहे. या बदलामुळे, राज्यातील जवळपास ७ लाख अतिरिक्त विद्यार्थ्यांना लाभ होईल.

४८. माझे शासन, “ छत्रपती राजाराम महाराज कौशल्य व उद्योजकता अभियान ” राबवित आहे. या अभियानांतर्गत, पात्र व्यक्तींना वैयक्तिक कर्जावरील व्याजाच्या प्रतिपूर्तीचा तसेच गट कर्जावरील व्याजाच्या प्रतिपूर्तीचा लाभ मिळेल. व्यावसायिक पाठ्यक्रमांसाठी, वसतिगृहांमध्ये राहणाऱ्या आर्थिकदृष्टया दुर्बल विद्यार्थ्यांना नागरी क्षेत्रांमध्ये प्रति वर्षी दहा हजार रुपये व ग्रामीण क्षेत्रांमध्ये प्रति वर्षी आठ हजार रुपये इतका निर्वाह भत्ता देण्यात येईल.

४९. मुंबई विद्यापीठाच्या अर्थशास्त्र विभागाचे “ मुंबई अर्थशास्त्र व सार्वजनिक धोरण प्रशाला ” असे नामांतर करण्यात आले असून, ही प्रशाला जागतिक दर्जाच्या उच्च प्रतीचे संशोधन हाती घेईल. पुढील पाच वर्षांसाठी या प्रशालेकरिता २५ कोटी रुपये इतक्या रकमेस मान्यता देण्यात आली आहे.

५०. व्यावहारिक दृष्टीकोनासह ग्रामीण विकासाच्या गरजा भागविण्यासाठी विद्यासंस्था स्थापन करण्याची आवश्यकता लक्षात घेऊन, माझ्या शासनाने, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद येथे “ श्री. गोपीनाथराव मुंडे राष्ट्रीय ग्रामीण विकास संस्था ” उभारण्याचे ठरविले आहे.

५१. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि कर्करोग रुग्णालय, औरंगाबाद यास “ राज्य कर्करोग संस्था ” म्हणून निर्देशित करण्यात आले असून कर्करोग रुग्णांची वाढती संख्या विचारात घेता रेडिओथेरपी उपचाराकरिता नवीन युनिट देखील सुरू करण्यात येत आहे.

५२. माझ्या शासनाने, शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून १०० एम.बी.बी.एस. प्रवेश क्षमतेच्या जागांसह नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालय जळगाव येथे सुरु करण्याचे ठरविले आहे.

५३. युवकांना आवश्यक कौशल्य देण्यासाठी, "प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास" या प्रचलित प्रकल्पांतर्गत मोठ्या उद्योग गटांशी ८९ सामंजस्य करारांवर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या आहेत. परिणामी, ९.८ लाख युवकांना कौशल्य प्राप्त होईल आणि पुढील ३ वर्षांत त्यांना नोकरीच्या संधी उपलब्ध होतील.

५४. व्यावसायिक प्रशिक्षणाकरिता सिमेन्स, बॉश, टाटा ट्रस्ट यांसारख्या विविध औद्योगिक संघटना आणि व्यावसायिक शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय यांमध्ये सामंजस्य करारांवर स्वाक्षऱ्या करण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे आपल्या विद्यार्थ्यांच्या रोजगार मिळविण्याच्या क्षमतेत वाढ होईल.

५५. वाढती लोकसंख्या विचारात घेऊन, माझ्या शासनाने ऑटोरिक्षा व टॅक्सी परवान्यांवरील निर्बंध उठविण्याचे ठरविले आहे. त्यामुळे पन्नास हजार बेरोजगार तरुणांना रोजगार मिळणार आहे.

५६. अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांचे उच्च शिक्षण सुरु ठेवण्यासाठी, वसतिगृहे आणि शालेय इमारती या महत्त्वाच्या बाबी आहेत. २२ वसतिगृहांच्या मान्य आराखड्यांपैकी ९ वसतिगृहांचे बांधकाम नियमित पाठपुरावा करुन तातडीने करण्यात येत आहे.

५७. इयत्ता ११ वी व १२ वी तसेच व्यावसायिक आणि बिगर व्यावसायिक पदवी आणि पदव्युत्तर पाठ्यक्रमांना प्रवेश घेतलेल्या अनुसूचित जाती आणि नवबौद्ध समाजातील विद्यार्थ्यांकरिता "डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना" सुरू करण्यात आली आहे.

५८. विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित शैक्षणिक संस्थेमध्ये शिक्षण घेणाऱ्या निरधिसूचित जमातीच्या (विमुक्त जाती), भटक्या जमातीच्या, इतर मागासवर्गाच्या आणि विशेष मागासप्रवर्गाच्या विद्यार्थ्यांकरिता फी माफी योजनेअंतर्गत पात्र उत्पन्नाच्या मर्यादेत ६ लाख रुपयांवरुन ८ लाख रुपये इतकी वाढ करण्यात आली आहे.

५९. राज्यातील वक्फ मालमत्तांच्या संबंधातील विवादांवर अभिनिर्णय करण्याकरिता त्रिसदस्यीय वक्फ न्यायाधिकरण स्थापन करणाऱ्या काही राज्यांपैकी महाराष्ट्र हे एक राज्य आहे.

६०. अल्पसंख्याक समुदायातील महिलांना स्वयंरोजगारासाठी प्रशिक्षित करण्याकरिता, "स्वयंसहायता गट योजनेस पूरक निधी" याअंतर्गत ११ जिल्ह्यांमध्ये ३,१७६ महिला स्वयंसहायता गट स्थापन करण्यात आले आहेत.

६१. उर्दू भाषा व संस्कृतीचे जतन करण्यासाठी व तिचा प्रचार करण्यासाठी नांदेड येथे "उर्दू घर" स्थापन करण्यात आले आहे. मालेगाव व सोलापूर शहरांमध्ये आणखी दोन उर्दू घरे स्थापन करण्यात येत आहेत.

६२. मागील वर्षी दिलेल्या वचनानुसार, निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती), भटक्या जमाती, इतर मागासवर्ग आणि विशेष मागासप्रवर्ग यांच्यासाठी असलेल्या कल्याणकारी योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याकरिता माझ्या शासनाने एक स्वतंत्र विभाग कार्यान्वित केला आहे.

६३. पंचायतींच्या प्रभावी कार्यान्वयनासाठी सरपंचपदाची थेट निवडणूक घेण्याची तरतूद करण्यासाठी महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ यामध्ये सुधारणा करण्यात आली आहे. यामुळे सरपंचाच्या पदावधीस पर्याप्त संरक्षण मिळण्याबरोबरच पंचायतींच्या संबंधांत उत्तरदायित्वसुद्धा साध्य होऊ शकेल.

६४. एक अत्यंत अभिमानाची गोष्ट म्हणजे राज्यातील सार्वजनिक वितरण व्यवस्थेचे संपूर्णपणे संगणकीकरण करण्यात आले आहे. रास्त भावाच्या सर्व ५२,१४५ दुकानांमध्ये सेवा यंत्रे बसविण्यात आली आहेत आणि त्यामधील अन्नधान्याच्या वितरणाचा तपशील संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आला आहे.

६५. राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियमाखाली ६.१ कोटी इतक्या शिधापत्रिका धारकांना आधारशी संलग्न करण्यात आले आहे. या प्रक्रियेद्वारे राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियमाखाली यापूर्वी स्थूलमानाने ज्या ९२ लाख लोकांचा समावेश झाला नव्हता, त्यांना प्रत्येक महिन्याला आता प्रति किलो ३ रुपये दराने २ किलोग्रॅम तांदूळ व प्रति किलो २ रुपये दराने ३ किलोग्रॅम गहू पुरविण्यात येत आहे. जवळपास १० लाख अपात्र शिधापत्रिका धारकांना वगळण्यात आल्यामुळे हे शक्य झाले आहे.

६६. राज्यातील १० जिल्ह्यांत आधार संलग्न सार्वजनिक वितरण व्यवस्थेचा हा आकृतीबंध यशस्वीपणे राबविण्यात आला असून, राज्याच्या उर्वरित भागातही ही व्यवस्था टप्याटप्याने कार्यरत व्हावी यासाठीचे नियोजन सुरू आहे.

६७. माझ्या शासनाने, महाराष्ट्राला हागणदारीमुक्त करण्यामध्ये मोठी प्रगती केली आहे. आतापर्यंत राज्यामधील २७,६७० ग्रामपंचायतींपैकी २२,७९३ ग्रामपंचायतींना आणि ३५१ गटांपैकी २१२ गटांना हागणदारीमुक्त म्हणून घोषित करण्यात आले आहे.

६८. माझ्या शासनाने "मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमा" अंतर्गत १,११५ कोटी रुपये खर्चाच्या ४७० पाणीपुरवठा योजनांना मंजुरी दिली आहे. त्याचबरोबर २४.७ कोटी रुपये खर्चाच्या १८ प्रादेशिक पाणीपुरवठा योजनांच्या पुनरूज्जीवनासही मंजुरी दिली आहे.

६९. मराठवाड्यातील सततची दुष्काळग्रस्त स्थिती सुधारण्याचा माझ्या शासनाने निर्धार केला असून वॉटर ग्रीड योजनेच्या सर्वेक्षणाचे काम सुरु आहे. वॉटर ग्रीड यंत्रणा उभारण्यासाठी तांत्रिक ज्ञान कौशल्य विषयक सहयोगाकरिता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण आणि मेकोरेट, इस्त्राईल यांच्यामध्ये एका सामंजस्य करारावर स्वाक्षरी देखील करण्यात आली आहे.

**७०.** एक हजार अब्ज डॉलर्स अर्थव्यवस्थेचे उद्दिष्ट गाठताना, सार्वजनिक पायाभूत सुविधा प्रवर्धित करण्याच्या बाबतीत एक भक्कम पाऊल उचलण्यासाठी माझ्या शासनाने, आंतरराष्ट्रीय निधीची गुंतवणूक आकर्षित करण्याचे आणि त्या माध्यमातून राज्याच्या अर्थसंकल्पात भरीव प्रमाणात साधनसंपत्तीची तरतूद करण्याचे निश्चित केले आहे. डॉएच्च बँकेच्या २०१७ च्या अहवालानुसार, भारतातील सर्वात मोठ्या पायाभूत सुविधा प्रकल्पांपैकी ५० टक्के प्रकल्पांची कामे फक्त महाराष्ट्रातच सुरू आहेत.

**७१.** वाढत्या वाहतुकीच्या समस्येवरील एक उपाय म्हणून मेट्रो रेल्वेची उपयुक्तता लक्षात घेता, माझ्या शासनाने, मुंबई, पुणे व नागपूर महानगर प्रदेशांमध्ये एक लाख कोटी रुपये इतक्या अंदाजित खर्चाच्या विविध मेट्रो प्रकल्पांच्या अंमलबजावणीचे काम वेगाने करण्याचे ठरविलेले आहे.

**७२.** नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचा विकास करण्यासाठीच्या सर्व मंजुऱ्या मिळविण्यात आलेल्या आहेत. विमानतळाच्या मध्यवर्ती भागातील विकासविषयक कामे सुरू करण्यात आली असून एका धावपट्टीचे काम डिसेंबर, २०१९ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे. आगामी नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाकडे जाण्यासाठी थेट प्रवेशमार्ग विकसित करण्याकरिता मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने मुंबई आणि नवी मुंबई यांना जोडणारा १७,८४३ कोटी रुपये इतक्या अंदाजित खर्चाचा मुंबई ट्रान्स हार्बर लिंक रस्ता बांधण्याचे काम हाती घेतले आहे.

**७३.** राज्याच्या विविध भागात बहरणारे पर्यटन आणि उद्योग लक्षात घेता, नवीन विमानतळ विकसित करणे महत्वाचे आहे. प्रादेशिक जोडणी योजनेत अधिसूचित केलेल्या ९ विमानतळांपैकी, नांदेड, जळगाव आणि नाशिक विमानतळांवरून विमान सेवा सुरू करण्यात आली आहे. उर्वरित विमानतळांवरील सेवा लवकरच सुरू होतील. त्याचबरोबर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळ, नागपूर यासाठी विकासकाची नियुक्ती करण्यात येत आहे. पुणे विमानतळाच्या विकासासाठी चांगी विमानतळ व्यवस्थापनाशी सामंजस्य करारावर स्वाक्षरी करण्यात आली आहे.

**७४.** माझ्या शासनाने, राज्यातील रेल्वे प्रकल्पांच्या जलद अंमलबजावणीकरिता रेल्वे मंत्रालयाशी विशेष प्रकल्प उपक्रम प्रस्थापित केला आहे. तसेच, मुंबई - अहमदाबाद जलदगती रेल्वे प्रकल्पात समन्यायी सहभाग घेण्याचाही निर्णय घेतला आहे.

**७५.** माझ्या राज्याने, रस्ते विकास योजना, २००१-२०२१ अंतर्गत जवळपास ३.३७ लाख किलोमीटर रस्ते बांधणी उद्दिष्टांपैकी ३ लाख किलोमीटरहून अधिक किलोमीटर रस्ते बांधणी पूर्ण केली आहे. जवळपास १५,४०४ किलोमीटर राज्य महामार्गांचे राष्ट्रीय महामार्गात रूपांतर करण्यातही

माझे राज्य यशस्वी झाले आहे. नागपूर आणि मुंबई दरम्यान रस्ते प्रवास वाहतूक वेगवान व सुलभ होण्याच्या दृष्टीने, विशेष प्रकल्प उपक्रमाद्वारे नागपूर-मुंबई अतिजलद दळणवळण द्रुतगती मार्गाचे बांधकाम हाती घेण्यात आले आहे. द्रुतगती मार्गाच्या जलद विकासासाठी शेतकरी त्यांच्या जमिनी स्वेच्छेने देत आहेत ही मोठी समाधानाची बाब आहे.

**७६.** माझ्या शासनाने, मुंबई-पुणे द्रुतगती मार्गाची क्षमता वाढविण्यासाठी ४,७९७ कोटी रुपये मंजूर केले आहेत.

**७७.** माझ्या शासनाने, २०५२ या वर्षापर्यंतच्या सवलत कालावधीकरिता वर्सोवा-वांद्रे सागरी सेतू प्रकल्प मंजूर केला आहे.

**७८.** "मुख्यमंत्री ग्रामसडक योजना" या विद्यमान योजनेतंर्गत रस्ता नसलेल्या वस्त्यांना जोडणे आणि विद्यमान ग्रामीण रस्त्यांची दर्जावाढ करण्याचे मोठ्या प्रमाणात नियोजन केले आहे. ८,५९४ किलोमीटरच्या मंजूर केलेल्या रस्त्यांच्या कामांपैकी जवळपास २,५५० किलोमीटरच्या रस्त्यांचे काम पूर्ण करण्यात आले आहे आणि उर्वरित काम प्रगतिपथावर आहे.

**७९.** भारत सरकारने, "सागरमाला" कार्यक्रमांतर्गत प्रवासी सेवेसाठी विविध बंदरांवर पायाभूत सोयी सुविधांच्या विकासासाठी २२२ कोटी रुपये खर्चाच्या ११ प्रकल्पांना मान्यता दिलेली आहे व ते डिसेंबर, २०१९ पर्यंत कार्यान्वित होणे अपेक्षित आहे.

**८०.** रस्ते वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी माझ्या शासनाने, नवीन भाऊचा धक्का (फेरी व्हार्फ) ते मांडवा बंदर अशी रो-रो फेरी सेवा आणि नवीन भाऊचा धक्का (फेरी व्हार्फ) ते नेरुळ, अशी प्रवासी फेरी सेवा सुरू करण्याचे ठरविले आहे. मांडवा बंदरामध्ये जेट्टी व लाटांपासून संरक्षण करणारा बंधारा बांधण्याचे काम प्रगतिपथावर आहे आणि ते मार्च, २०१८ अखेरीस पूर्ण होणे अपेक्षित आहे.

**८१.** माझे शासन, लवकरच महाराष्ट्राच्या किनाऱ्यावर बेलापूर येथील पनवेल खाडीत पहिल्या "मरिना" प्रकल्पाचे बांधकाम हाती घेत आहे. या प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यामध्ये, ३० बोटींसाठी नांगरण सुविधा निर्माण करण्यात येईल.

**८२.** माझे शासन, नागरीकरण ही समस्या न मानता संधी समजून धोरण तयार करीत आहे. राज्यातील नागरी परिस्थितीत बदल करण्यासाठी केंद्रपुरस्कृत "अटल पुनरूज्जीवन व नागरी पुनरूत्थान अभियानाची" मदत होईल. या अभियानात ४४ शहरांचा समावेश असून ७६ टक्के इतक्या नागरी लोकसंख्येस याचा लाभ होईल. केंद्र सरकारने या योजनेअंतर्गत ७,७५० कोटी रुपयांच्या वार्षिक कृती आराखड्यास मंजुरी दिली आहे.

**८३.** केंद्र सरकारच्या " स्मार्ट शहर अभियाना " अंतर्गत एकूण २,००० कोटी रुपये इतका निधी शहरांकरिता देण्यात आला आहे.

**८४.** उद्दिष्टित १५.५ टक्के वाढीचा दर साध्य करण्यासाठी निर्मिती क्षेत्रात दर वर्षी ९.५ टक्के वाढ होणे आवश्यक आहे. माझ्या शासनाने, व्यवसाय सुलभतेत वाढ करण्याचे धोरण (ईज ऑफ डुईंग बिजनेस) अंगीकारले आहे. त्यामुळे खाजगी उद्योगास चालना मिळून निर्मिती क्षेत्रात भरीव वाढ होईल.

**८५.** हे साध्य करण्याकरिता, माझ्या शासनाने, वस्त्रोद्योग क्षेत्राला चालना देण्यासाठी एक विशेष धोरण लागू केले असून त्यानुसार सहकारी सूतगिरण्यांना प्रति युनिट ३ रुपये दराने वीज अर्थसहाय्य दिले जाईल. सहकारी सूतगिरण्यांव्यतिरिक्त अन्य वस्त्रोद्योग युनिटांनादेखील प्रति युनिट २ रुपये दराने वीज अर्थसहाय्य देण्यात येईल. विणकाम व विणमाल (होजीयरी) युनिटांनादेखील वीज अर्थसहाय्य देण्यात येत आहे. नवीन युनिटांना प्रकल्प खर्चाच्या २५ टक्क्यांपर्यंत भांडवली अर्थसहाय्य देण्यात येईल. विदर्भ, उत्तर महाराष्ट्र आणि मराठवाडा या कापूस उत्पादक क्षेत्रातील संयुक्त गिरण्यांसाठी ४५ टक्क्यांपर्यंत अर्थसहाय्य देण्यात येईल. प्रकल्प खर्चाच्या ९ कोटी रुपयांपर्यंत अर्थसहाय्य पुरवून त्याद्वारे कापूस उत्पादक क्षेत्रांमध्ये वस्त्रोद्योग केंद्रांना चालना देण्यात येत आहे. तयार कपड्यांच्या उद्योग क्षेत्रात विशेषतः महिलांच्या रोजगारास चालना देण्यासाठी, कौशल्य कार्यक्रमास मान्यता देण्यात आली आहे.

**८६.** विशेषतः ज्यांना प्रस्थापित बँकिंग क्षेत्राकडून पुरेशा प्रमाणात वित्तीय सेवा मिळत नाहीत अशा गरीब-गरजू लोकांना अभिनव पद्धतीने वित्तीय सेवा देण्यास आणि सुशिक्षित तरुणांना रोजगार पुरविण्यास चालना देण्यासाठी माझ्या शासनाने, एक अभिनव वित्ततंत्रज्ञान धोरण राबविण्याचे ठरविले आहे. या धोरणांतर्गत, मुंबईमध्ये वित्ततंत्रज्ञान केंद्र (फिन्टेक हब) स्थापन करण्यासाठी अतिरिक्त चटईक्षेत्र निर्देशांक उपलब्ध करणे, सामाईक सोयीसुविधा उभारण्यासाठी भांडवली सहाय्य करणे यांसाठी भारतीय स्टेट बँकेसारख्या बँकांबरोबर भागीदारी करणे, यासंबंधीची तरतूद केली आहे.

**८७.** तरूण उद्योजकांना प्रेरणा मिळण्यासाठी माझ्या शासनाने, नवीन " महाराष्ट्र राज्य नवउद्यम उभारणी धोरण-२०१८ " लागू केले आहे. त्या धोरणाद्वारे वैयक्तिक निधी (एन्जल फन्ड) आणि बीजभांडवल निधीद्वारे ५,००० कोटी रुपये इतकी गुंतवणूक आकर्षित करण्याचे ध्येय ठेवले आहे, त्यामुळे पुढील ५ वर्षांत, ५ लाख नोकऱ्या आणि स्वयंरोजगाराच्या संधी निर्माण होतील. नवउद्यम युनिटांना अनुज्ञप्ती आणि इतर विनियामक तपासणींपासून मुक्त ठेवण्यात येईल.

**८८.** पर्यावरणातील कार्बनचे प्रमाण कमी करण्यासाठी माझ्या शासनाने, विद्युतचालित वाहननिर्मिती धोरणास मंजुरी दिली आहे. या धोरणांतर्गत, विजेवर चालणारी वाहने खरेदी करणाऱ्या व्यक्तींना थेट अर्थसहाय्य देण्यात येईल. तसेच, अशी विजेवर चालणारी वाहने निर्मिती करणाऱ्या निर्मात्याकरिता एक विशेष प्रोत्साहनात्मक तरतूद करण्यात येईल.

**८९.** राज्याच्या विकासात लॉजिस्टिक क्षेत्र महत्त्वाची भूमिका बजावित आहे हे ओळखून माझ्या शासनाने, अलिकडेच लॉजिस्टिक धोरण घोषित केले आहे. या धोरणानुसार बहुविध प्रकारचे लॉजिस्टिक केंद्र स्थापन करणे शक्य व्हावे याकरिता त्यासंबंधातील निर्बंध शिथिल करण्यात आले असून, अत्यंत कमी अधिमूल्यामध्ये अतिरिक्त चटईक्षेत्र निर्देशांक उपलब्ध करून दिला आहे आणि लॉजिस्टिक क्षेत्राला एक उद्योग म्हणून घोषित करण्यात आले आहे.

**९०.** औद्योगिक युनिटांना परवडण्याजोगी जमीन उपलब्ध करून देण्याच्या हेतूने, एकात्मिक औद्योगिक क्षेत्र धोरणात सुधारणा करून त्याद्वारे आवश्यक असलेले क्षेत्र हे २० हेक्टरपर्यंत कमी करण्यात आले आहे.

**९१.** भारत सरकारच्या संरक्षणविषयक उत्पादनांच्या स्वदेशीकरणाच्या धोरणास अनुसरून, माझ्या शासनाने, समूह विकास प्रकल्प उभारून विशाल तसेच सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगाच्या युनिटांना विशेष सहाय्य करून त्याद्वारे संरक्षणसंबंधित घटकांच्या महाराष्ट्रातील उत्पादनास प्रोत्साहन देणारे एक विशेष धोरण जाहीर केले आहे.

**९२.** सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांना परवडण्यायोग्य किंमतीने इमारतीची जागा उपलब्ध करून देण्यासाठी माझ्या शासनाने, एक " विस्तारित गाळा योजना " घोषित केली आहे. या योजनेअंतर्गत, औद्योगिक परिवास्तूंच्या बांधकामासाठी २०० टक्के इतका अतिरिक्त चटईक्षेत्र निर्देशांक उपलब्ध करून दिला आहे.

**९३.** भारत सरकारने राज्याच्या विकासासाठी ४४ सूक्ष्म व लघुउद्योग समूहांना मंजुरी दिली असून, त्याद्वारे पुढील ३ वर्षांमध्ये १०० कोटी रुपये इतक्या अपेक्षित अनुदानासह एक लाखाहून अधिक व्यक्तींना थेट रोजगार मिळेल.

**९४.** जागतिक बँकेने, व्यवसाय करण्याच्या सुलभतेच्या निकषांवर आधारित जगातील १९० अर्थव्यवस्थांचे सर्वेक्षण केले आहे. या मानांकनामध्ये व्यवसाय करण्याच्या सुलभतेमध्ये २०१७ मधील भारताचा गुणानुक्रम १३० वरून, सन २०१८ मध्ये १०० एवढा लक्षणीयरीत्या सुधारला आहे. मुंबई आणि दिल्ली या शहरात केलेल्या सर्वेक्षणाप्रमाणे, ही प्रगती प्रामुख्याने महाराष्ट्रात व्यवसाय

करण्याच्या सुलभतेत सुधारणा केल्यामुळे झालेली आहे. व्यवसाय सुलभतेच्या १० निदर्शक तत्त्वांपैकी ९ निदर्शक तत्त्वांबाबतीत मुंबईचा क्रमांक दिल्लीपेक्षा खूपच वरचा आहे.

**९५.** पुढील ५ वर्षांमध्ये महिला उद्योजकांच्या संख्येत ९ टक्क्यांवरून २० टक्के इतकी वाढ करण्याच्या उद्देशाने, माझ्या शासनाने, अलिकडेच महिला उद्योजकांकरिता एक विशेष धोरण घोषित केले आहे.

**९६.** याशिवाय, माझ्या शासनाने ३० आदिवासी महिला विद्यार्थिनींना प्रशिक्षण देऊन त्यांना राज्य परिवहन महामंडळाच्या बस गाड्यांवर चालकाची नोकरी देण्याचे ठरविले आहे. महिलांना राज्य परिवहन महामंडळाच्या बस गाड्यांच्या चालकाची नोकरी देण्याचा हा भारतातील पहिलाच उपक्रम आहे.

**९७.** दूरसंचार पायाभूत सुविधा क्षेत्राला चालना देण्यासाठी माझ्या शासनाने, ‘एक खिडकी योजने’ मार्फत त्वरित मंजुरी देणारे धोरण जाहीर केले आहे.

**९८.** राज्यातील जनतेला पारदर्शक, कार्यक्षम आणि समयोचित सेवा उपलब्ध करून देण्यासाठी, राज्यात दिनांक २८ एप्रिल, २०१५ पासून महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम लागू करण्यात आला आहे. त्याअंतर्गत ३१ डिसेंबर, २०१७ पर्यंत ४३८ लोकसेवा अधिसूचित केल्या असून, त्यांपैकी, ३९९ लोकसेवा “आपले सरकार” या पोर्टलवर ऑनलाईन उपलब्ध आहेत.

**९९.** माझ्या शासनाने, राज्यात संपूर्ण परीक्षा संगणक आधारित घेण्यासाठी ऑनलाईन “महापरीक्षा” पोर्टल सुरू केले आहे. त्यानुसार, सुमारे ४ महिन्यांच्या अल्प कालावधीतच, २ लाख अर्जदारांच्या परीक्षा घेण्यात आलेल्या आहेत.

**१००.** शासकीय विभागांना होस्टींगची सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी माझ्या शासनाने, क्लाउड संगणकीय धोरण लागू केले आहे. त्याद्वारे राज्यातील क्लाउड सेवा प्रदात्यांना गुंतवणूक करण्यासाठी चालना मिळेल.

**१०१.** केंद्र सरकार पुरस्कृत “डिजिटल इंडिया भूमिअभिलेख आधुनिकीकरण कार्यक्रमाची” राज्यात यशस्वीरीत्या अंमलबजावणी करण्यात येत आहे. या कार्यक्रमांतर्गत ३४.३ कोटी इतके जुने भूमिअभिलेख स्कॅन करण्यात आले आहेत आणि ते इ-शोध या पोर्टलवर लवकरच नागरिकांना ऑनलाईन उपलब्ध करून देण्यात येत आहेत. याच कार्यक्रमांतर्गत अभिलेख कक्षांचे आधुनिकीकरण करण्यात येत असून पहिल्या टप्प्यात रायगड, औरंगाबाद, पुणे, नाशिक, अमरावती व नागपूर या सहा जिल्ह्यांतील जमिनींच्या नकाशांचे डिजिटलीकरण करण्यात येत आहे.

**१०२.** माझे शासन, सर्वांसाठी घरे पुरविण्यास कटिबद्ध असून त्यादृष्टीने ‘प्रधानमंत्री आवास योजनेची’ अंमलबजावणी करीत आहे. केंद्रीय मंजुरी व संनियंत्रण समितीने ७६ प्रकल्पांना तत्त्वतः मान्यता दिली असून त्यात २,१५,९३० निवासी गाळ्यांचा अंतर्भाव आहे. या प्रकल्पांसाठी आवश्यक निधीची तरतूद करण्यात आली आहे.

**१०३.** असंरक्षित भोगवटादारांना कोणत्याही पुनर्वसन व्यवस्थेशिवाय झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्रातून निष्कासित केले जात असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यातील बहुतांश लोक हे पुन्हा झोपडपट्टी क्षेत्रात स्थलांतरित होत असल्याने “झोपडपट्टी मुक्त शहर” व “सर्वांसाठी घरे” या अभियानांचा उद्देश विफल होत आहे. निष्कासित केल्यानंतर बेघर होणाऱ्या अशा असंरक्षित भोगवटादारांना विविध उपाययोजनांद्वारे त्यांना परवडतील अशी घरे पुरविण्यासाठी माझ्या शासनाने, अधिनियमात सुधारणा प्रस्तावित केल्या आहेत.

**१०४.** स्थावर संपदा (विनियमन व विकास) अधिनियम, २०१६ यामुळे पारदर्शकतेत वाढ झाली आहे व ग्राहकांना अधिकार प्राप्त झाले असून या अधिनियमाचा संपूर्ण क्षेत्रावर चांगला परिणाम झाला आहे. फेब्रुवारी, २०१८ च्या मध्यापर्यंत १५,३३९ स्थावर संपदा प्रकल्पांना प्रमाणपत्रे आणि १२,७०२ स्थावर संपदा अभिकर्त्यांना नोंदणी प्रमाणपत्रे देण्यात आली असून ८०० पेक्षा अधिक तक्रारींबाबत न्याय करण्यात आला आहे. “महारेरा” हे संपूर्णपणे ऑनलाईन पद्धतीचा स्वीकार करणारे देशातील पहिले प्राधिकरण आहे.

**१०५.** शाश्वत विकासामध्ये हवामान बदल ही एक गंभीर समस्या आहे म्हणून हवामान बदलाला सामोरे जाण्यासाठी वृक्षाच्छादित क्षेत्रात वाढ करणे हा एक महत्त्वाचा पर्याय आहे. माझ्या शासनाने, सन २०१७ ते २०१९ या तीन वर्षांच्या कालावधीकरिता ५० कोटी रोपे लावण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. त्यानुसार १ जुलै ते ७ जुलै, २०१७ या दरम्यान नागरिकांच्या सहभागाने एकूण ५.४३ कोटी रोपे लावण्यात आली आहेत. अशा प्रकारे रोपे लावणे हा एक प्रारंभिक टप्पा असून ती रोपे जगविणे हे खरे उद्दिष्ट आहे. ते उद्दिष्ट साध्य करण्यासाठी आपल्यापैकी प्रत्येकाने प्रयत्न करणे आवश्यक आहे. जेणेकरून आपले सर्वांचे जीवन अधिक सुसह्य होईल.

**१०६.** “एनर्जी इफिशन्सी सर्व्हिस लिमिटेड” या कंपनीच्या भागीदारीने ३७० कोटी रुपये इतक्या भांडवली गुंतवणुकीसह अनिवासी शासकीय इमारतींमध्ये ऊर्जा कार्यक्षमता कार्यक्रम हाती घेणारे महाराष्ट्र हे भारतातील पहिले राज्य ठरले आहे.

**१०७.** लोकसंख्येचा वाढता दर पाहता, कायदा व सुव्यवस्था राखणे आणि समाज गुन्हेगारीमुक्त ठेवणे ही समस्या आहे. माझ्या शासनाने, महिला व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांशी संबंधित गुन्हे कमी करण्यासाठी आणि सांप्रदायिक सलोखा जपण्याकरिता विशेष उपाययोजना हाती घेतल्या आहेत. महिलांविरुध्दच्या गुन्ह्यांच्या तत्पर आणि योग्य तपासासाठी प्रत्येक जिल्ह्यात एक विशेष पथक स्थापन करण्यात येत आहे.

**१०८.** नक्षली कारवायांना आळा घालण्यासाठी माझे शासन सातत्याने कार्यरत आहे. नक्षली कारवायांचे उच्चाटन करण्याकरिता माझ्या शासनाने, एक " बिरसा मुंडा पुनर्वसन प्रकल्प " घोषित केला आहे. या प्रकल्पांतर्गत, तरूणांना राज्य परिवहन उपक्रमामध्ये प्रशिक्षण देऊन त्याद्वारे, त्यांचे पुनर्वसन करण्याचे उद्देशित केले आहे. देशभरातील हा अशा प्रकारचा पहिलाच उपक्रम आहे.

**१०९.** राज्यभर विविध नागरी सेवा सुविधा देण्याबरोबरच, गुन्हा व गुन्हेगारांचा माग घेण्यासाठी नेटवर्क व यंत्रणा (सी.सी.टी.एन.एस.) प्रकल्प यशस्वीरीत्या पार पाडणाऱ्या प्रगत राज्यांपैकी महाराष्ट्र हे एक राज्य आहे. २१ डिसेंबर, २०१७ रोजी कार्यान्वित केलेल्या भ्रमणध्वनी ॲप्लिकेशनद्वारे आता नागरिकांना महाराष्ट्र पोलिसांपर्यंत पोहोचणे अधिक सोईस्कररीत्या शक्य झाले आहे.

**११०.** न्यायव्यवस्था मजबूत करण्यासाठी १४ व्या वित्त आयोगाच्या शिफारशीस अनुसरून राज्य शासनाने, १८ अतिरिक्त न्यायालये, २४ जलदगती न्यायालये व १४ कौटुंबिक न्यायालये पाच वर्षांसाठी मंजूर केली आहेत.

**१११.** अतिरिक्त न्यायालये निर्माण करणे, न्यायालयीन इमारती चांगल्या स्थितीत रहाण्यासाठी व त्यांची दुरुस्ती तसेच तांत्रिक मनुष्यबळ, स्कॅनिंग, डिजिटलीकरण, लोक अदालत, पर्यायी विवाद आणि हितसंबंधितांची क्षमता वृध्दी यांकरिता माझ्या शासनाने, १८६ कोटी रुपये इतकी अतिरिक्त आर्थिक तरतूद केली आहे.

**११२.** माझ्या शासनाने, धर्मादाय आयुक्त यांच्यासमोरील प्रकरणांचा जलदगतीने निपटारा करण्यासाठी, धर्मादाय संघटनेचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी आणि सार्वजनिक धर्मादाय प्रयोजनात वाढ करण्याकरिता धर्मादाय संघटनेच्या कामकाजात सुधारणा करण्यासाठी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियमामध्ये मोठ्या प्रमाणावर सुधारणा केली आहे.

**११३.** महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाने, " मराठी विश्वकोश " याचे २० खंड तयार केले असून आता ते ॲन्ड्रॉईड व आयफोन वरील " विश्वकोश " भ्रमणध्वनी ॲपच्या स्वरूपात उपलब्ध आहेत. यामध्ये १५० विषयांवरील सुमारे १८,००० लेखांचा समावेश करण्यात आला आहे.

**११४.** अमराठी भाषिक लोकांकरिता राज्य मराठी विकास संस्था, मुंबई आणि मुंबई विद्यापीठाचा जर्मन भाषा विभाग, यांनी मराठी भाषा अध्ययन पद्धत हा प्रकल्प संयुक्तरीत्या हाती घेतला आहे. माझ्या शासनाने, चालू आर्थिक वर्षामध्ये या प्रकल्पासाठी पहिला हप्ता म्हणून ३८ लाख रुपये इतका निधी दिला आहे.

सन्माननीय सदस्यहो, या अधिवेशनात पूरक मागण्या, २०१८-२०१९ या वर्षाचा अर्थसंकल्प, विविध विधेयके, इतर शासकीय व अशासकीय कामकाज आपल्यापुढे विचारार्थ मांडण्यात येईल.

या अधिवेशनातील आपल्या सर्व विचारविमर्शास मी सुयश चिंतितो.

**जय हिंद ! जय महाराष्ट्र !!**